# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी निमित्त विचार मंथन




श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वडाळा आयोजित महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी हा कार्यक्रम कार्य शाळेत पार पडला. या कार्यक्रमात महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार विद्यार्थ्यांना सांगून क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी केली . लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मा.श्री योगेश गायकवाड सर यांची व्यासपीठावर उपस्थित होती . निदेशक श्री संभाजी जाधव सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

कार्यक्रमासाठी उपस्थित प्राचार्य योगेश गायकवाड सर आणि निदेशिका संध्याराणी शिंदे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आद्य शिक्षक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रसिद्ध साहित्यां बद्दल माहिती दिली तसेच त्यांचे प्रसिद्ध पुस्तक गुलामगिरी मधील लेखनावर भाषण केले. तसेच निदेशक गाडे सर यांनी आत्मविश्वास कसा वाढवायचा या विषयावर भाषण करून विध्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.